# पुणे महानगरपालिका
## स्थायीसमिती
## कार्यपत्रिका क्र. ५४
## सभा क्र. ६५ (खास), दिनांक ३१/३/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष (खास) सभा गुरुवार, दिनांक ३१/३/२०२२ रोजी, सकाळी ११.३० (साडेअकरा)वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन,पुणे येथे (दृकश्राव्य–ऑनलाईन)पध्दतीने संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**विषय क्र. २५३१**

भारतरत्न अटलबिहारीवाजपेयीवैद्यकीय महाविद्यालयाच्या अनुषंगाने कै. बाबुराव सणस हॉस्टेलमध्ये मॉड्युलर फर्निचर पुरविणे व बसविणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचेजा.क्र मआ/भवन/१६४३, दि. २९/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २५३२**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेच्या रक्कमेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/उआवि/१६४४, दि. ३०/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २५३३**

पुणे महानगरपरिवहन महामंडळाकरिता खरेदी करावयाच्या १६० ई– बसेसपैकी पुणे मनपाच्या हिश्श्याची र. रू. ४८ कोटी निधी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/प्रकल्प/१६४५, दि. ३०/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २५३४**

सुपरस्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणे च्या बांधकामासाठी रू. ३ कोटी निधीची वर्गीकरणाने आर्थिक मदत करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/आरोग्य /१६४७, दि.३०/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक १९/८/२०२१ रोजी वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**